दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२४५ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, १५ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## मराठा आरक्षणासाठी २० फेब्रुवारीला राज्य सरकारचे विशेष अधिवेशन







**■मुंबई। यश सावंत,** : मराठा आरक्षणाच्या निर्णयासाठी २० फेब्रुवारीला राज्य सरकारचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येणार आहे. बुधवारच्या मंत्रीमंडळ बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा आंदोलनाबाबत अधिसूचना जारी केली होती. मराठा समाजाच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या होत्या. शासनाकडून तसं पत्रही मनोज जरांगे पाटील यांना देण्यात आलं होतं. या निर्णयाचे कायद्यात रुपांतर होण्यासाठी हे अधिवेशन बोलावण्यात आले आहे. आता एक दिवसांच्या या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षणावर कायदा पारित करण्याची शक्यता आहे. तसेच सगेसोयरे शब्दाच्या अनुषंगाने कायदा पारित करण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे.

सरकारने मराठा आरक्षणाबाबत जी अधिसूचना काढली आहेत त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी मनोज जरांगे पाटील आंदोलन करत आहेत. याशिवाय अंतरवाली सराटीसह मराठा आंदोलनादरम्यान मराठा बांधवांवर दाखल गुन्हे मागे घ्यावेत, शासनाने सगेसोयरे यांचा कायदा पास करावा, विधिमंडळाचे अधिवेशन घ्यावे, हैदराबाद व इतर ठिकाणचे गॅजेट स्वीकारावे इत्यादी मागणीसाठी अंतरवाली सराटीमध्ये सध्या जरांगे पाटील उपोषण करत आहेत. मनोज जरांगे यांचा हा झंझावात पाहून राज्य सरकारने मराठा आंदोलक नवी मुंबईत पोहोचल्यानंतर त्यांच्याशी चर्चा सुरु केली होती. मराठा आरक्षणाचा आदेश निघाल्याशिवाय मागे हटणार नाही, अशी भूमिका जरांगे-पाटील यांनी घेतली होती. अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. यावेळी मराठा आरक्षणासंदर्भात अधिसूचना काढण्यात आली होती. त्यामुळे जरांगे-पाटील यांनी माघार घेतली होती. परंतु, त्याच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम असल्यामुळे जरांगे-पाटील गेल्या आठवड्यात शनिवारपासून पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यामुळे राज्य सरकारविरोधात मराठा आंदोलकांचा रोष वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारकडून एकदिवसीय अधिवेशनात मराठा आरक्षणासंदभार्तील कायदा मंजूर केला जाण्याची शक्यता आहे.

## ठाण्यात सुरु होणार देशातील पहिली 'स्वच्छ भारत अकादमी'

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार



**मुंबई, विशाल कारंडे :** महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातंर्गत ठाण्यातील शासकीय तांत्रिक विद्यालय देशातील पहिली स्वच्छ भारत अकादमी सुरू करण्यात येणार आहे याबाबत बुधवारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि बिव्हीजी - भारत विकास ग्रुप यांच्या दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या या करारप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगूरू डॉ. अपूर्वा पालकर, भारत विकास ग्रुप- बिव्हीजीचे हणमंत गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाला देशव्यापी एका चळवळीचे स्वरुप दिले आहे. या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची कमतरता भासू नये यासाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे हे लक्षात घेऊन राज्यात स्वच्छ भारत अकादमी सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि भारत विकास ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने तरुणांना प्रशिक्षण देने, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत अकादमी मध्ये विविध प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी अभ्यासक्रम शिकवण्यात येणार असून या संदभार्तील विविध अभ्यासक्रमांना व प्रमाणपत्रे, पदविका व पदवी अभ्यासक्रम निश्चित करण्यात येणार आहेत.महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास नाविन्यता सोसायटी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ आणि भारत विकास ग्रुप संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अकादमीमध्ये विविध अभ्यासक्रम राबविणार आहे.

## 'बेघर मुलांची समस्या सोडवणे हे आमचे उद्दिष्ट' – श्रीमती सुसीबेन शहा

**जनकवी पी. सावळाराम सभागृहात संपन्न झालेल्या 'एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत' राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा शहा बोलत होत्या.**

**ठाणे, नितीन देवळेकर :** मुंबई, पुणे अशी शहरे बेघर मुलांपासून मुक्त व्हायला हवीत यासाठी आमचे प्रयत्न होत राहतील. इतर समुदाय आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, परंतु मुलं ही व्हॉइस लेस असतात. बेघर मुलांची समस्या सोडवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आपणच त्यांचा आवाज बनण्याची गरज आहे. बेघर मुलांसाठी मंडळाची निर्मिती व्हावी यासाठी मी स्वतः प्रयत्न करेन याची राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुसीबेन शहा यांनी ग्वाही दिली. जनकवी पी. सावळाराम सभागृहात संपन्न झालेल्या चौथ्या सत्रात शहा बोलत होत्या. या सत्राचे अध्यक्ष एड. सुयश प्रधान होते. या सत्रात बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या नीलिमा चव्हाण आणि रिमांड होम डोंगरी येथील अधीक्षक रोहीत कंठीकर, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे माजी सदस्य संतोष शिंदे हे वक्ते सहभागी झाले होते. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील 'बिईंग मी समिती' व 'जीवन संवर्धन फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी फ्रॉम स्ट्रगल टू स्ट्रेंथः नेव्हिगेशन अँड नेटवर्किंग फॉर हॉमलेस चिल्ड्रेन या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. पहिल्या सत्रात जीवन संवर्धन फाउंडेशनच्या डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी बेघर मुले ही



संकल्पना विस्ताराने विशद केली. या बेघर मुलांचा प्रश्न खूप गंभीर असून ही राष्ट्राच्या विकासात बाधा ठरत आहे.

यासाठी अश्या मुलांच्या आयुष्यात तिमिरातून तेजाकडे जाणारी वाट निर्माण करणे, हे आपले कर्तव्य आहे. अशी भूमिका मांडली. या राष्ट्रीय परिषदेमध्ये सादर केल्या जाणाऱ्या शोध निबंधांचा गोषवारा मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

## 'जवानांचे बलिदान देश कधीही विसरणार नाही'; पुलवामातील शहीदांना पंतप्रधान मोदींनी वाहिली श्रद्धांजली !





**■ नवी दिल्ली, प्रगती शर्मा:** १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जैश-ए-मोहम्मदच्या दहशतवाद्यांनी पुलवामा जिल्ह्यात सीआरपीएफ जवानांना घेऊन जाणाऱ्या बसवर स्फोटकांनी भरलेले वाहन घुसवून स्फोट घडवून आणला. त्यात ४० जवान शहीद झाले होते. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले होते. आज या घटनेला ५ वर्षे पूर्ण झाले. भारताच्या इतिहासात १४ फेब्रुवारी हा काळा दिवस मानला जातो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत भारतमातेच्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.

पुलवामा हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या शूर वीरांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांची सेवा आणि आपल्या देशासाठीचं त्यांचं बलिदान नेहमीच स्मरणात राहील. , असे ट्विट मोदींनी केले. सोशल मीडियातूनही त्या काळ्या दिवसाच्या आठवणी जागवत शहीदांचे स्मरण केले जात आहे. काश्मीर खोऱ्यातील पुलवामा येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी CRPF च्या बसवर हल्ला केला होता. त्यावेळी बसमधून प्रवास करत असलेले ४० CRPF जवान शहीद झाले.

या घटनेने संपूर्ण देश हादरला. या भ्याड हल्ल्यामागे जैश-ए-मोहम्मद या पाकिस्तानी दहशतवादी संघटनेचा हात होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कराने पाकव्याप्त काश्मीरमध्ये सर्जिकल स्ट्राइकही केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या धाडसी निर्णयाचं भारतीय नागरिकांकडून मोठं समर्थनही करण्यात आलं.

## पिंपरी–चिंचवड महापालिकेची ११०० जाहिरात फलकधारकांना नोटीस; दिला कारवाईचा इशारा



**■ पिंपरी, अभिजित येरल्लू :** महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने शहरातील ११०० जाहिरातफलकधारकांना (होर्डिंग) थकीत शुल्क भरण्यासाठी नोटीस दिली आहे. थकीत शुल्काची रक्कम २९ फेब्रुवारीपर्यंत भरावी अन्यथा फलक अनधिकृत गृहीत धरून कारवाईचा इशारा दिला आहे. शहरात महापालिकेच्या जागेत जाहिरातफलक उभारले जातात. तसेच, खासगी जागामालकांना जाहिरातफलक उभारण्यास परवानगी दिली जाते. हेच महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नाचे साधन आहे. अनधिकृतपणे फलक उभारून जाहिरातदार महापालिकेचे उत्पन्न बुडवतात. तसेच, परवाना घेतल्यानंतरही शुल्क भरले जात नाही. दरम्यान, १७ एप्रिल २०२३ मध्ये किवळेतील दुर्घटनेनंतर सर्वच जाहिरात फलकांचा स्थापत्यविषयक अहवाल घेण्यात आला. परंतु, फलक परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया थांबविण्यात आली होती. अखेर आकाशचिन्ह व परवाना विभागाने ही कार्यवाही सुरू केली. त्यानुसार ११०० जाहिरातफलकधारकांना मागणी (डिमांड) नोटीस देण्यात आली आहे. त्यांना शुल्काची रक्कम जमा करण्यासाठी २९ फेब्रुवारीची मुदत देण्यात आली आहे. हे नूतनीकरण १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी होणार आहे. त्याप्रमाणे मागणी नोटीस देण्यात आली आहे. शुल्क जमा केल्यानंतर परवान्याचे नूतनीकरण होणार आहे. ज्या फलकाचा जाहिरात परवाना नूतनीकरण होणार नाही तो फलक अनधिकृत गणला जाऊन काढून टाकण्याची कारवाई केली जाणार आहे.

## कोकण रेल्वेचा महिनाभरात ९,५४८ प्रवाशांवर कारवाईचा बडगा, जानेवारीत 'इतक्या' कोटीचा दंड वसूल



**■ रत्नागिरी, योगेश होळंब :** कोकण रेल्वेतूनप्रवास करताना जानेवारी महिन्यात विनातिकीट प्रवास करणाऱ्या ९,५४८३ प्रवाशांवर कोकण रेल्वे प्रशासनाने कारवाई करत महिनाभरात तब्बल २ कोटी १७ लाख ९७ हजार १०२ रुपयांचा दंड वसूल केला आहे. नव्या वर्षात फुकट्या प्रवाशांवर कोकण रेल्वे प्रशासनाने कारवाईचा चांगलाच बडगा उगारला आहे. गाडीला गर्दी असल्याची संधी साधून काही प्रवासी विनातिकीट गाडीत घुसतात. त्यामुळे रीतसर तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर अन्याय होतो. त्याचबरोबर रेल्वे प्रशासनाचे करोडो रुपयांचे नुकसान होते. त्यामुळे कोकण रेल्वे प्रशासनाने विनातिकीट प्रवास करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यासाठी ऑगस्ट २०२३ या महिन्यापासून विशेष मोहीम हाती घेतली आहे. प्रत्येक महिन्याला कोकण रेल्वे प्रशासनाची ही कारवाई सुरू असते. जानेवारी या महिन्यात राबविलेल्या तिकीट तपासणी मोहिमेत विनातिकीट प्रवास करणाऱ्या ९,५४८ प्रवाशांकडून २,१७,९७,१०२ रूपयांचा दंड वसूल केला आहे. ऑगस्ट २०२३ पासून ही मोहीम सुरू झाली आहे. आतापर्यंत प्रत्येक महिन्याला करण्यात आलेल्या तिकीट तपासणीत ३७,३८६ विनातिकीट प्रवासी आढळले. त्यांच्याकडून ७,०५,८२, २५४ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. यापुढेही तिकीट तपासणी मोहीम नियमित सुरू राहणार आहे. यात दोषी आढळलेल्या प्रवाशांवर कारवाई करण्यात येणार आहे.

## उपनगरी रेल्वेगाड्यांमधील महिलांच्या डब्यात घुसून बाबा–बुवांच्या जाहिराती चिकटवणारी टोळी सक्रिय

**महिलांच्या डब्यांत अंधश्रद्धा वाढवणाऱ्या जाहिराती लावण्याचे प्रकार वाढल्याच्या प्रवाशांच्या तक्रारी आहेत. याविरोधात वेळोवेळी कारवाई केली जाते. भोंदूबाबाच्या जाहिरातीमधील माहिती ही चुकीची असते. त्यामुळे जाहिरातीतून चुकीचा प्रसार केला जातो. दुपारच्या वेळेत जाहिरात लावल्या जात असतील तातडीने कारवाई केली जाईल. झ डॉ. स्वप्निल निला, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे**

**■ मुंबई, भावना जैन :** उपनगरी रेल्वेगाड्यांमधील महिलांच्या डब्यात घुसून तीन ते चार तरुण बाबा-बुवांच्या जाहिराती चिकटवून पसार होत आहेत. या टोळ्यांवर कारवाई केली जात असल्याचे रेल्वे प्रशासन सांगत आहे, मात्र प्रत्यक्षात ही टोळी सक्रिय असून प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर धावणाऱ्या उपनगरी गाड्यांच्या डब्यांत अंधश्रद्धा वाढवणाऱ्या जाहिराती लावण्याचे प्रकार वाढले आहेत. दिशाभूल करणारी माहिती या जाहिरातींतून दिली जात आहे. अंधश्रद्धा पसरविणाऱ्या बाबा-बुवांच्या जाहिराती लावल्या जात आहेत. याविरोधात कारवाई केली जात असूनही असे प्रकार वारंवार घडत आहेत.



## अवैध गर्भलिंग निदान प्रकरणी आणखी एका डॉक्टरला अटक



**7 एकूण जण जेरबंद**

**■ कोल्हापूर, सचिन कदम :** येथे उघडकीस आलेल्या अवैध गर्भलिंग निदानप्रकरणी पोलिसांनी आणखी एका डॉक्टरला बुधवारी अटक केली. डॉ. युवराज निकम ( रा. गगनबावडा ) असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी सात जणांना अटक करण्यात आले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील नगरातील सुलोचना पार्कमधील एका घरात अवैध गर्भलिंग निदान केंद्र सुरु असल्याची माहिती मिळाल्याने आरोग्य विभाग आणि पोलिसांनी १६ जानेवारी रोजी छापा टाकला होता. या प्रकरणी बोगस डॉ. स्वप्नील केरबा पाटील, टेक्निशियन अमित केरबा डोंगरे, एजंट कृष्णात आनंदा जासूद, प्रदीप बाजीराव कोळी, पंकज नारायण बारटक्के, निखिल रघुनाथ पाटील या सहा जणांना आतापर्यंत पोलिसांनी अटक केली आहे. यातील मुख्य सूत्रधार बोगस डॉ. स्वप्नील केरबा पाटील याचा यापूर्वी मुरगुड आणि राधानगरी येथील अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपाताच्या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचे दिसून आले आहे. या प्रकरणात करवीर पोलीसांनी मुळचा म्हालसवडे ( ता. करवीर ) येथील आणि सध्या वैभववाडी येथे रुग्णालय चालवणारा डॉ. युवराज विलास निकम याला अटक केली आहे. त्याने वैभववाडीसह कोकण परिसरातील महिला गर्भलिंग निदानासाठी पाठवल्याची कबुली पोलीसांना दिली आहे.

## अर्नाळा जेट्टीचे काम अद्याप अपूर्णच; ग्रामस्थांचा बोटीत चढ–उतार प्रवास धोकादायक !

**■ वसई, दिगंबर जाधव :** वसई भाईंदर रोरो सेवेचा प्रकल्प पूर्णत्वास गेला आहे. असे असताना दुसरीकडे मात्र मागील सात वर्षांपासून विरारच्या अनार्ळा व अनार्ळा किल्ला या भागातील जेट्टीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे आजही येथील नागरिकांना फेरीबोटीतून धोकादायक प्रवास करावा लागत आहे. विरार पश्चिमेच्या भागात अनार्ळा किल्ला परिसर आहे. हा परिसर बेटावर असल्याने या भागातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी बोटीतून प्रवास करावा लागतो.किनाऱ्यावर जेट्टी नसल्याने ही फेरीबोट समुद्रातच थांबवून गुडघाभर पाण्यातून ये-जा करावी लागत आहे. या धोकादायक प्रवासातून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे जेट्टी तयार करण्याचे काम २०१७ मध्ये सुरू करण्यात आले होते.






अनार्ळा किल्ला व अनार्ळा किनारा अशा दोन्ही टोकावर या जेट्टी तयार करण्यात येत आहेत यासाठी सुमारे २६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला होता. या जेट्टीचे काम अगदी कासवगतीने सुरू असल्याने जवळपास सहा ते सात वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी नाही. या जेट्टीचे काम पूर्ण झाले.

आजही येथील नागरिकांना गुडघाभर पाण्यातून चालत जाऊन बोटीतून चढ उतार करून धोकादायक प्रवास करावा लागतो. शाळकरी मुले, महिला वर्ग ज्येष्ठ नागरिक यांची परवड होते. त्यामुळे ही जेट्टी पूर्ण होणार तरी कधी प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

नुकताच महाराष्ट्र सागरी मंडळाने वसई भाईंदर असा रोरो सेवेचा प्रकल्प हाती घेऊन तो पूर्ण ही केला.परंतु मागील सहा ते सात वर्षांपासून रखडलेल्या अवस्थेत असलेल्या अनार्ळा जेट्टीच्या कामाला विलंब का असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. दररोज अनार्ळा किल्ला व अनार्ळा या भागातून मोठ्या संख्येने प्रवासी ये जा करतात त्यासाठी असलेली फेरीबोट व्यवस्थित पणे उभी राहावी यासाठी जेट्टी महत्वाची तीच अजूनही अपूर्ण असल्याने येथील ग्रामस्थांचे हाल सुरूच आहेत. कोकण विभागाचा पर्यटन विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाकडून रोरो सेवा यासारखे प्रकल्प हाती घेऊन पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही स्वागतार्ह बाब आहे परंतु विरारच्या पश्चिमेला ऐतिहासिक जंजिरे अनार्ळा किल्ला आहे. आजही हा किल्ला पाहण्यासाठी दुर्गमित्र व पर्यटक विविध भागातून येतात.त्यांना ही या धोकादायक रित्या फेरी बोटीतून चढ उतार करून प्रवास करावा लागतो. जर जेट्टी पूर्ण झाली तर येथून बोटीने प्रवास सुलभ होईल. याशिवाय येथील पर्यटनाला ही चालना मिळेल असे नागरिकांनी सांगितले आहे.

## रंगयुक्त सुपारींनी भरलेली ११ ट्रक वाहने जप्त; अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई



**■ नाशिक, विशाल पाटील** : अन्न व औषध प्रशासन गुप्तवार्ता विभागाकडून जिल्ह्यातील मालेगाव-मनमाड रस्त्यावर करण्यात आलेल्या धडक कारवाईत रंगयुक्त सुपारीचा ११ ट्रक वाहनांसह साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत तीन कोटी ८४ लाख १९ हजार ९८३ रुपये असून पहिल्यांदाच एकाचवेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागास मालेगाव- मनमाड रस्त्याने कर्नाटकातून दिल्ली येथे रंग लावलेल्या सुपारीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने अन्न सुरक्षा अधिकारी (दक्षता) अविनाश दाभाडे यांनी वऱ्हाणे शिवारातील हॉटेल हरयाणा मेवात ढाबा येथे शोध घेतला असता त्यांना रंग लावलेल्या सुपारीची अवैध वाहतूक करणारी ११ वाहने हॉटेलमागे छुप्या पद्धतीने उभी असल्याचे आढळून आले. सर्व वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये किटकांच्या प्रादुभावनि खराब झालेली आणि ते लपवण्यासाठी रंग लावलेल्या भेसळयुक्त सुपारीचा सुमारे २५० टन साठा आढळून आला. नाशिक येथील पथकालाही बोलावण्यात आले. पथकाने सुपारीचे ११ नमुने विश्लेषणासाठी घेतले. उर्वरीत २५३.३ टन साठा जप्त करण्यात आला आहे. भेसळीविरोधात अशा प्रकारची कारवाई कायमच सुरु राहील, असा इशारा अन्न व औषध विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

# पॅनकेक
## झटपट आणि चविष्ट

**साहित्य :-** २ वाटी मैदा किवा गव्हाचे पीठ, ३ चमचे पिठीसाखर, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, ३ चमचे तूप, १ ते दिड वाटी दूध. १ चमचा, व्हॅनिला एस्सेंस

**कृती:-** मैदा, पिठीसाखर, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा, व्हॅनिला, मेल्टेड तुप हे सर्व साहित्य व्यवस्थित एकत्र करुन घ्यावे. यानंतर यामध्ये थोडे-थोडे दुध घालून मिश्रण थोडे सैलसर करावे. इडलीच्या मिश्रणाप्रमाणे हे मिश्रण तयार झाले पाहीजे. जास्त पातळ करु नये. आता हे मिश्रण पाच मिनिटासाठी झाकून ठेवावे. यानंतर (अगदी बारीक आचेवर) नॉनस्टीक पॅन वरती थोडेसे तुप लावून घ्यावे, व त्यावर पळीने थोडे-थोडेसे मिश्रण घालावे (फुलक्या एवढेच लहानसे पसरावे). एका बाजुने भाजून दुसया बाजूनेही सोनेरी सर भाजून घ्यावे. ही अगदी साधीसोपी एगलेस पॅन केकेची रेसिपी आहे.



**टिप्स -**

● बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर या दोघांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे दोन्ही वापरले जाते. ● जर या मिश्रणामध्ये बेकिंग सोडा ऐवजी एक अंडे फेटून घातले तर तो पॅनकेक ही चविष्ट लागतो.

# मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू

केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळवून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.

**पालक:**
पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.

**गाजर :**
लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.





**दही:**
दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी 6 आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

**रताळे :**
ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

**बेदाणे :**
आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन( लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

# कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे वाचा आणि लगेच अमलात आणा

हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया



● कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.

● दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.

● पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.

● कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.

● कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.

● उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.

● अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.

● रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.

● रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.

● संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.

● मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.

● हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.

## दिनविशेष

१५ फेब्रुवारी

◆१८७६: अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल व एलिशा ग्रे यांनी एकाच दिवशी टेलिफोनच्या पेटंटसाठी अर्ज केला.

◆१८८१: भारतातील पहिल्या होमिओपाथिक कॉलेजची कोलकाता येथे स्थापना.

◆१८९९: अमेरिकेत निवडणुकांसाठी मतदान यंत्रे वापरण्यास सुरूवात झाली.

◆१९२४: संगणक तयार करणारी कंपनी आय.बी.एम ची स्थापना.

◆१९४५: दुसरे महायुद्ध झ रॉयल एअर फोर्स च्या विमानांनी तुफानी बॉम्बफेक करुन जर्मनीतील ड्रेस्डेन शहर बेचिराख केले.

◆१९४५: चिली, इक्वेडोर, पॅराग्वे व पेरू या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९४६: पहिला संगणक एनियाक युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हेनियात प्रदर्शित करण्यात आला.

◆१९४६: बँक ऑफ इंग्लंडचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

◆१९६३: अणुक्रमांक१०३ असलेले लॉरेन्सिअम हे मूलद्रव्य प्रथमच तयार करण्यात आले.

◆ १९८९: भोपाळ दुर्घटनेबद्दल भारत सरकारला ४७,००,००,००० अमेरिकन डॉलर नुकसान भरपाई देण्याचे यूनियन कार्बाईडने कबूल केले.

◆१९८९: ईराणच्या आयातोल्ला खोमेनीने ब्रिटिश लेखक सलमान रश्दीच्या खूनाचा फतवा काढला.

◆ २०००: अभिजित कुंटे हा भारताचा चौथा आणि महाराष्ट्राचा दुसरा ग्रॅंडमास्टर बनला.

# गरम पाणी पिण्याचे फायदे


**जर** आपण त्वचेच्या समस्येने अस्वस्थ आहात किंवा त्वचेसाठी वेगवेगळी सौंदर्यप्रसाधने वापरून थकला असाल तर दररोज गरम पाणी पिणे सुरू करा. यामुळे आपली त्वचा समस्येतून मुक्तता होईल आणि चेहराही उजळेल.

• सकाळी उपाशीपोटी आणि रात्री जेवल्यानंतर गरम पाणी प्यायल्याने पचन समस्याही दूर होते.

• गरम पाणी पिण्याचे खूप फायदे असतात; ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. याने कफ आणि सर्दी लवकर दूर होते.

• वजन कमी करण्यातही गरम पाणी खूप मदत करते. गरम पाण्यात थोडं लिंबू किंवा काही थेंब मधाचे मिसळून प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.

• नेहमी तरुण दिसण्याची इच्छा ठेवणाऱ्यांसाठी गरम पाणी एका अतिशय चांगल्या औषधाचे काम



# गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

जर तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता.

गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

**पीसी वर क्रोम भाषा बदला**

• गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.

• त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग




सेटिंग्स वर जा.

• इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.

• आता Add Languages वर क्लिक करा.

• Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.

• आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

**एंड्राइड वर क्रोम भाषा बदला**

• फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.

• त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.

• सेटिंग्समध्ये जाऊन Lanfguages वर जा.

• त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.

• भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

# तिसऱ्या कसोटी सामन्यातून बुमराह बाहेर?

नवी दिल्ली:भारत आणि इंग्लंड यांच्यातील 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना 15 फेब्रुवारीपासून राजकोट येथील सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळवला जाईल. सध्या ही मालिका 1-1 अशी बरोबरीत सुरू आहे. पहिली कसोटी इंग्लंडने जिंकली. भारताने दुसरी कसोटी जिंकली होती. आता दोन्ही संघ तिसरी कसोटी जिंकून मालिकेत स्वतःला मजबूत करण्याचा प्रयत्न करतील, मात्र तिसऱ्या कसोटीपूर्वी टीम इंडियातील अनेक बदलांबाबत महत्त्वाचे अपडेट्स समोर आले आहेत जे चाहत्यांना आश्चर्यचकित करतील. भरतपासून बुमराहपर्यंत हे बदल होऊ शकतात राजकोटमध्ये खेळल्या जाणाऱ्या तिसऱ्या कसोटीत यष्टिरक्षक फलंदाज केएस भरत संघाच्या बाहेर असू शकतो. भारताच्या जागी युवा यष्टिरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलला तिसऱ्या सामन्यात कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळू शकते. या मालिकेतील दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये भरतने आक्रमक फलंदाजी केली नाही. त्याने दोन्ही सामन्यांच्या 4 डावात 41, 28 आणि 17, 06 धावा केल्या आहेत. याशिवाय जसप्रीत बुमराहच्या संदर्भात रिपोर्टमध्ये एक मोठे अपडेट देण्यात आले आहे. वास्तविक, बुमराहला चौथ्या कसोटीसाठी विश्रांती दिली जाऊ शकते. आतापर्यंत बुमराहने सलग दोन्ही कसोटी सामने खेळले आहेत.त्याचवेळी, रिपोर्ट्समध्ये हे देखील सांगण्यात आले होते की, आवेश खानला मागील तीन कसोटींसाठी टीम इंडियाच्या संघात का स्थान मिळाले नाही. पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी आवेश संघात होता, पण त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. आता त्याला रणजी ट्रॉफी खेळण्यासाठी संघातून वगळण्यात आले आहे.




## भविष्य

**मेष** हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

**वृषभ** कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

**मिथुन** सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

**कर्क** अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

**सिंह** यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्‌भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं. विचित्र अडचणी

**कन्या** बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक** फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळवातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठ नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

**धनु** उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

**मीन** अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 7 | | 1 | | 2 | 6 | |
| | 5 | | | | 6 | 3 | | 1 |
| | | | | | | | 8 | 5 |
| | 7 | 4 | 6 | 2 | | | | |
| | | 9 | 7 | | 3 | | 1 | |
| | 2 | | 9 | | 5 | | | |
| | 9 | 3 | | | | | | |
| 7 | | | 8 | | 2 | | 3 | 4 |
| 8 | | | 3 | 7 | 9 | | | |

## उत्तर सुडोकू - ६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 3 | 5 | 2 | 7 | 8 | 6 | 4 |
| 2 | 4 | 5 | 9 | 6 | 8 | 7 | 1 | 3 |
| 6 | 7 | 8 | 1 | 4 | 3 | 9 | 2 | 5 |
| 7 | 3 | 4 | 2 | 8 | 5 | 1 | 9 | 6 |
| 5 | 6 | 1 | 3 | 7 | 9 | 2 | 4 | 8 |
| 8 | 2 | 9 | 6 | 1 | 4 | 3 | 5 | 7 |
| 9 | 5 | 2 | 8 | 3 | 6 | 4 | 7 | 1 |
| 3 | 1 | 7 | 4 | 5 | 2 | 6 | 8 | 9 |
| 4 | 8 | 6 | 7 | 9 | 1 | 5 | 3 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# ...आणि श्रेयसचे डोळे पाणावले !



नुकताच महेश मांजरेकरांच्या ही अनोखी गाठ या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करण्यात आला. या चित्रपटातून श्रेयस तळपदे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ट्रेलर लॉंच प्रसंगी श्रेयसने मंचावरून उपस्थितांसोबत संवाद साधला. यावेळी श्रेयस सर्वांसमोर भावूक झाला आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू तरळले. ही अनोखी गाठ या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा पार पडला असून, हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हृदयविकाराच्या झटक्यानंतर या चित्रपटाच्या निमित्ताने श्रेयस मनोरंजन क्षेत्रात पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. अभिनेता श्रेयस तळपदेला गेल्या डिसेंबरमध्ये हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन गेला. त्याच्यावर तातडीने अँजियोप्लास्टी करण्यात आली आणि त्यातून श्रेयसला पुन्हा जीवनदान मिळालं आहे. आजारपणानंतर अशाप्रकारे पुनरागमन करताना श्रेयस म्हणाला, आता माझ्याकडे बोलायला शब्दच नाहीत. माझ्यासोबत जे झालं त्याची उजळणी खरंच नको, पण असं कोणत्याही वैऱ्यासोबतही घडू नये. या काळात मला लोकांचा आशीर्वाद, प्रेम आणि प्रार्थना लाभल्या. अनेकांनी प्रेमाने माझ्यासाठी बरंच काही केलं. मी त्यांचे ऋण या जन्मात फेडू शकणार नाही. माझ्यासाठी तर हा माझा नवा जन्मच आहे. आमची मदत केलेल्या प्रत्येकाचे मी मनापासून आभार मानतो. आता आजारपणानंतर श्रेयस मोठ्या पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. महेश मांजरेकर यांच्या ही अनोखी गाठ या चित्रपटातून तो लवकरच दिसेल.

# उर्फीचा 'व्हॅलेंटाईन डे' स्पेशल लूक चर्चेत



आपल्या अतरंगी स्टाईलमुळे सतत चर्चेत असणाऱ्या उर्फी जावेदच्या अनोख्या स्टाईलचे व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असतात. अनेकजण तिच्या हटके स्टाईलचं कौतुक करतात तर काहीजण तिला प्रचंड ट्रोल देखील करत असतात. मात्र, उर्फी कोणालाही न घाबरता सडेतोड उत्तर देताना दिसते. दरम्यान आज उर्फीने व्हॅलेंटाईन डे स्पेशल खास लूक केला आहे. उर्फीचा व्हॅलेंटाईन डे स्पेशल लूक पाहा उर्फी जावेद व्हॅलेंटाईन डेला ग्लॅमरस लूकमध्ये दिसत आहे. अभिनेत्रीने 14 फेब्रुवारीला खास ड्रेस परिधान केला आहे. व्हॅलेंटाईन डे निमित्त उर्फीने तिचा खास लूक शेअर केला आहे. ज्यात उर्फीने बेबी पिंक कलरचा ट्युब टॉप घातला असून खाली त्याच रंगाचा स्कर्ट घातला आहे. शिवाय तिच्या या ड्रेसला गुलाबाचे एक मोठे फूल देखील लावलेले आहे. यावेळी उर्फीला पाहून अनेकांनी तिच्यासोबत फोटो काढले. उर्फीचा हा लूक पाहून चाहते तिचं खूप कौतुक करत आहेत. बिग बॉस ओटीटी 2 मध्ये पाहुणी म्हणून एंट्री उर्फीने बिग बॉस ओटीटीमधून प्रसिद्धी मिळाली. उर्फी ही बिग बॉसमध्ये फार काळ नव्हती. पण, बिग बॉसमधून बाहेर पडल्यानंतर उर्फीने वेगळ्या फॅशन सेन्सने सर्वांचे लक्ष वेधले. यानंतर उर्फीला सोशल मीडियावर अल्पावधीत प्रसिद्धी मिळाली. नुकतेच उर्फीने बिग बॉस ओटीटी 2 मध्ये पाहुणी म्हणून एंट्री घेतली होती.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# ‘कॅग’चे ‘ऑडिट’ कोण करणार ?

सरकारने केलेले आर्थिक गैरव्यवहार आणि नियमभंग उघडकीस आणून चर्चेत राहणाऱ्या भारताच्या महालेखापरीक्षकांचे (कॅग) पद यावेळी मात्र वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आले आहे. महालेखापरीक्षक (कॅग) हे सरकारची पारदर्शकता व जनतेच्या पैशाप्रतीचे उत्तरदायित्व सुनिश्चित करतात; परंतु एकत्रित निवडणुकां सारखी संकल्पना व कमकुवत होणारा माहिती अधिकार कायदा यामुळे राज्यव्यवस्थेसमोर उत्तरदायित्वाचे संकट आहे. कॅग च्या वर्तमान कामगिरीमुळे ते अधिक गडद होऊ शकते. सरकारने केलेले आर्थिक गैरव्यवहार आणि नियमभंग उघडकीस आणून चर्चेत राहणाऱ्या भारताच्या महालेखापरीक्षकांचे (कॅग) पद यावेळी मात्र वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आले आहे. गेल्या काही वर्षांपासून कॅग मार्फत होणाऱ्या सरकारच्या आर्थिक व्यवहारांच्या लेखापरीक्षणाच्या अहवालांची संख्या कमी होत असल्याचे दिसून आले आहे. कॅग च्या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या अहवालविषयक आकडेवारीचे विश्लेषण काही दिवसांपूर्वी प्रसारमाध्यमांत प्रसिद्ध झाले आहे.

सरकारने केलेल्या खर्चाची तपासणी करण्यासाठी स्वायत्त संस्थेचे अस्तित्व असणे, हे लोकशाही व्यवस्थेची अनिवार्य पूर्वअट आहे. या खर्चाची तपासणी करण्यासाठी राज्यघटनेत महालेखापरीक्षक, ज्याला इंग्रजीतील संक्षिप्त रूपात कॅग या नावाने ओळखले जाते, या पदाची तरतूद केली आहे. राज्यघटनेतील कलम १४८ ते १५१ मध्ये कॅग चे पद व त्याचे अधिकार याविषयी तरतुदी केल्या आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांना जनतेच्या कल्याणार्थ पैसे खर्च करण्यासाठी संचित निधी, आकस्मिक निधी व सार्वजनिक निधी अशा तीन प्रकारच्या निधीची तरतूद घटनेत केली आहे. या निधीतून केंद्र व राज्य सरकार यांनी जनहितासाठी खर्च करणे अभिप्रेत आहे. सरकारच्या हिशेब वहीमध्ये (लेखापुस्तिका) दर्शवलेली रक्कम ज्या उद्दिष्टासाठी खर्च करणे आवश्यक होते त्यासाठीच खर्च झाली का? ही रक्कम कायदेशीर प्रक्रियेतून संमत झाली होती का? ज्या अधिका याने सदर खर्च केला तसा त्याला अधिकार होता का? तसेच असा खर्च करण्याची गरज होती का? की सरकारने जनतेच्या पैशाची नाहक उधळपट्टी केली? त्यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे का? अशा प्रश्नांच्या आधारे सरकारी हिशेबाची तपासणी करून त्यासंदभार्तील चिकीत्सक अहवाल तयार करण्याची जबाबदारी कॅग वर आहे. कॅग च्या या महत्त्वाच्या भूमिकेमुळे त्याला जनतेच्या पाकिटाचा संरक्षक असे म्हणतात. तसेच घटना परिषदेत कॅग विषयी चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, भारतीय राज्यघटनेत कॅग हा सर्वात महत्त्वाचा अधिकारी आहे, असे उद्गार काढून त्याचे महत्त्व अधोरेखित केले होते. कॅग चे पद हे कार्यकारी मंडळ म्हणजेच सरकारचे जनतेप्रती उत्तरदायित्व निश्चित करणारे साधन आहे. कॅग हा संसदेच्या वतीने सरकारच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करतो. त्यामुळे तो संसदेला उत्तरदायी आहे. तसेच संसदेची सार्वजनिक लेखा समिती कॅग ने संसदेत मांडलेल्या या अहवालांचे परीक्षण करते. त्यामुळे कॅग ला या समितीचा मार्गदर्शक, मित्र व तत्त्वज्ञ म्हणतात. तसेच कॅग हा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचेही हिशेब तपासतो. सन २०१४ ते २०१८ या पाच वर्षांत कॅग ने सरासरी ४० अहवाल दरवर्षी संसदेत मांडले. २०१९ ते २०२३ या पाच वर्षांत कॅग ने सरासरी फक्त २२ अहवाल दरवर्षी संसदेत मांडले. तर २०२३ या एका वर्षात कॅग ने अवघे १८ अहवाल मांडले. संरक्षण विभागाविषयीचे लेखापरीक्षण अहवाल २०१७ नंतर संसदेत मांडलेच गेले नाहीत. यामागे कदाचित राष्ट्रीय सुरक्षा हे कारण असावे. परंतु २०१७ आधी देशाची राष्ट्रीय सुरक्षा कॅग च्या अहवालांमुळे धोक्यात आली होती काय, हे कळण्यास मार्ग नाही. या घटत्या अहवालांमागे काही कारणे असू शकतात. कॅग च्या प्रमुखपदावरील हा अधिकारी भारतीय लेखा परीक्षण व लेखा विभागा चा प्रमुख असून या विभागातील अधिकाऱ्यांची भरती संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेतून केली जाते. या अधिकाऱ्यांना भारतीय लेखा परीक्षण व लेखा सेवा या सेवेत प्रवेश दिला जातो. सन २०१४-१५ मध्ये या सेवेतील अधिकाऱ्यांची संख्या ७८९ होती. तर सन २०२१-२२ मध्ये ही संख्या कमी होऊन ५५३ इतकी घटली आहे. इतर कर्मचाऱ्यांची संख्यादेखील लक्षणीयरित्या घटली आहे. कॅग च्या बहुमोल कार्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पातून होणारी वित्तीय तरतूद देखील कमी होत आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात कॅग साठी एकूण अर्थसंकल्पीय रकमेच्या ०.१३ टक्के इतकीच वित्तीय तरतूद करण्यात आली आहे. २०१४ नंतरही कॅग साठीची सर्वात कमी वित्तीय तरतूद आहे. एकूणच, कॅग च्या कार्यक्षमतेवर नकारात्मक प्रभाव पडण्यास वेगाने घटणारा अधिकारी व कर्मचारी वर्ग आणि कमी होत चाललेली वित्तीय तरतूद हे घटक कारणीभूत असल्याचे सकृतदर्शनी दिसते. परिणामी सरकारी खर्चाच्या परीक्षणाच्या कार्यात अडथळा निर्माण होत असून त्याचे प्रतिबिंब ह्यकॅगह्णच्या अहवालांच्या घटत्या संख्येत दिसून येते. कॅग चे अहवाल हे सरकारच्या वित्तीय व्यवस्थापनाचे मूल्यमापन करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. तसेच नागरिकांनाही सरकार नेमके कामकाज कसे करते आहे, याचा अंदाज येतो. शेवटी सरकार जो पैसा खर्च करते तो सामान्य जनतेच्या घामाचा पैसा आहे. कॅग च्या परखड अहवालांमुळे अनेकदा सरकारचा नैतिकतेचा बुरखा फाटला आहे. यापूर्वी कॅग ने संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयाचे देखील लेखापरीक्षण केले आहे.यातून कॅग ने वैश्विक पातळीवर आपली विश्वासार्हता सिद्ध केली होती.पण आता मायदेशातच कॅग च्या कार्यक्षमतेवर संशयाचे धुके पसरत आहे. संसदेत मांडल्या जाणाऱ्या ह्यकॅगह्णच्या अहवालांची घटती संख्या ही भारतीय लोकशाही व्यवस्थेतील नव्या रचनात्मक दोषाची नांदी आहे.

# राजभवनी कंडूशमन

**तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी हे मोठे भारीच गृहस्थ दिसतात. आपली घटनादत्त परंपरा अशी की विधिमंडळात वर्षातील पहिल्या अधिवेशनास संबंधित राज्याचे राज्यपाल संबोधि करतात आणि संसदेच्या वर्षातील पहिल्या सत्राची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होते. वस्तुत: जरी ही भाषणे राष्ट्रपती वा राज्यपाल यांची असतात असे मानले जात असले तरी प्रत्यक्षात ती अनुक्रमे केंद्र व राज्य मंत्रिमंडळाने लिहिलेली असतात. त्या त्या मंत्रिमंडळांच्या बैठकीच्या पटलावर ही भाषणे ठेवली जातात आणि त्यास रीतसर मंजुरी घेतली जाते. त्यानंतर त्याचा मसुदा राष्ट्रपती/ राज्यपाल यांस दिला जातो आणि मग या घटनात्मक पदांवरील व्यक्ती त्याचे सदनात वाचन करतात. राष्ट्रपती वा राज्यपाल हे केंद्र आणि राज्य सरकारांचे केवळ घटनात्मक प्रमुख असतात आणि त्याखेरीज त्यांस अन्य अधिकार असणे अपेक्षित नसते. याचा साधा अर्थ असा की मंत्रिमंडळाने लिहून दिलेल्या भाषणाखेरीज एक शब्दही या उभयतांनी सदनात तोंडातून काढावयाचा नसतो. शहाणे ही परंपरा पाळतात. परंतु अशांमध्ये तमिळनाडूचे राज्यपाल रवी यांची गणना करणे अंमळ अवघड.**

गतसाली या रवींनी लिखित भाषण सोडून आपलेच काही मुद्दे उत्स्फूर्तपणे भाषणात घुसवण्याचा प्रयत्न केला. तो अंगाशी आला आणि भाषणाचा सर्व लिखितेतर भाग कामकाजातून वगळावा लागला. घटनात्मक पदावरील व्यक्तीचे भाषण वगळण्याची वेळ येणे ही खरे तर अत्यंत नामुष्कीच. पण तीही या रविकराने गोड मानून घेतली आणि द्रमुक सरकारच्या पायात पाय घालून त्यांस पाडण्याचा उद्योग तसाच सुरू ठेवला. तथापि या वेळी त्यांनी जे केले तो म्हणजे कहर आहे! ते पाहिल्यावर काय म्हणावे या रवीस असा प्रश्न किमान लोकशाहीवाद्यांसही पडेल.



या राज्यपालांनी सदनात आपले अभिभाषण वाचलेच नाही. सुरुवातीचा तमिळ नागरिकांस शुभेच्छा देणारा परिच्छेद तेवढा त्यांनी वाचला आणि पुढच्या भाषणात असत्यकथन असल्याने मी ते वाचू इच्छित नाही, असे म्हणून या राज्यपालांनी भाषण वाचणे थांबवले. परंतु त्यांची पुढे अधिकच शोभा झाली. याचे कारण राज्यपालांनी भाषण वाचणे थांबवल्यावर तमिळनाडू विधानसभेच्या सभापतींनी आपल्याकडील त्या भाषणाच्या प्रतीच्या आधारे ते वाचणे सुरू केले. म्हणजे या राज्यपालांस जे उच्चारायचे नव्हते ते सारे सभापतींनी उच्चारल्याचे ऐकावे लागले आणि एवढेच नव्हे तर ते सारे राज्यपालांचे अभिभाषण म्हणून अधिकृत कामकाजात नोंदलेही गेले. स्वतःच्याच हाताने स्वतःच्या श्रीमुखात दोन भडकावून देण्याचा हा प्रकार! तो या राज्यपालांच्या अंगाशी आला आणि झाली तेवढी शोभा पुरेशी नव्हती म्हणून की काय हे महामहीम मधूनच परत निघून गेले. पुढे विधानसभेने या अभिभाषणासाठी राज्यपालांचे आभार मानणारा ठरावही मंजूर करून घेतला. तेव्हा आपण जे काही केले त्यामुळे नक्की कोणाचे काय साधले गेले याचा विचार राज्यपालांनी खरे तर करावयास हवा. ते असे काही अर्थातच करणार नाहीत. कारण असा काही साधक-बाधक विचार करण्याची या गृहस्थाकडे क्षमता असती तर मुदलात या पदावर त्यांस नेमले गेले नसते. अलीकडे राज्यपाल हे त्या व्यक्तीच्या घटनात्मक पद सांभाळण्याच्या क्षमतेपेक्षा त्या व्यक्तीच्या उटपटांगगिरी करण्याच्या तयारीसाठी निवडले जातात. त्याचमुळे गेल्या काही वर्षांत विविध राज्यांस भगतसिंग कोश्यारी, जगदीप धनखड, आरिफ मोहंमद खान वा हे रवी इत्यादींसारखे वैधानिकदृष्ट्या दिव्यांग महामहीम लाभले. यांनी केलेले उद्योग पाहिले की हा बरा की तो असा प्रश्न पडावा. एखादा राज्यपाल धरणे काय धरतो, दुसरा कोणी सरकारी विधेयकेच काय अडवतो, तिसऱ्या कोणास सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यावरही भान येत नाही! असा सगळा आनंदी-आनंद! ! तो साजरा झाल्यावर काही प्रश्न निर्माण होतात. उदाहरणार्थ या तमिळनाडूच्या महामहिमांनी घेतलेला आक्षेप. त्यातील एक मुद्दा राज्य सरकारने केलेल्या दाव्यांबाबत आहे. हे राज्यपालांचे भाषण मंत्रिमंडळाने लिहून दिलेले असते हा उल्लेख वर आलेलाच आहे. त्यानुसार मंत्रिमंडळ स्वतःच्या कर्तबगारीविषयी बढेचढे बोलणार आणि स्वतःचे अपयश झाकण्याचे प्रयत्न करणार हे उघड आहे. तसे होणे नैसर्गिकही. कारण मंत्रिमंडळ स्थापना ही राजकीय प्रक्रिया असते आणि सत्ताधीश या राजकीय प्रक्रियेतूनच विजयी होऊन आलेले असतात. तेव्हा त्यांनी विजय मिरवणे यात गैर ते काय? या महामहिमांस ते तसे गैर वाटत असेल तर सरकारचे गोडवे गाऊ नयेत असा सल्ला हे रवी महाशय राष्ट्रपती महोदयांस देऊ शकतील काय? ते पूर्वी पोलीस अधिकारी होते. त्यामुळे त्यांच्याकडे यासाठी आवश्यक धैर्य आहे असे चर्चेपुरते मान्य करता येईल. तेव्हा असा सल्ला त्यांनी राष्ट्रपती महोदयांस दिला तरी तो मानला जाईल काय? या पदांवरील व्यक्ती जरा काही स्वतंत्र विचार करू पाहतात असा नुसता संशय जरी दिल्लीश्वरांस आला, तर त्यांची अवस्था काय होईल याची कल्पनाही सद्यःस्थितीत करता येत नाही. सत्ताधीशांची तळी उचलण्यास नकार देण्याचा विचार जरी या मंडळींच्या मनात आला तर त्यांना मार्गदर्शक मंडळाच्या दारातही उभे केले जाणार नाही. दुसरे असे की असा विचार भाजप-शासित राज्यांतील राज्यपालांनीही केल्यास रवी वा तत्सम महामहिमांची प्रतिक्रिया काय असेल? ते या अशा राज्यपालांचे स्वागत करतील काय? रवी, आरिफ मोहमंद खान इत्यादी राज्यपाल हे भाजपेतर राज्यांतील राजभवनांचे निवासी आहेत. भाजप-शासित राज्यांत त्यांची रवानगी झालीच तर हे सर्व महामहीम पदाची सूत्रे स्वीकारण्याआधीच सुतासारखे सरळ होतील. तेव्हा घटनात्मक औचित्य, संकेत इत्यादी मुद्दे या मंडळींनी मांडू नयेत. त्यासाठी त्यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत. त्या झालेल्या आहेत ते भाजपेतर राज्यांस जमेल तितके आडवे कसे जाता येईल यासाठीच. राजकारणातील अतृप्त व्यक्तींची रवानगी ठिकठिकाणच्या राजभवनांत करताना हे सर्व सरकारनियुक्त उपकृत जीव स्थानिक राज्य सरकारांची डोकेदुखी कशी वाढवतील असा विचार संबंधितांच्या मनांत नव्हता याची हमी देता येणे अवघड. ती खुद्द भाजपवासीही देणार नाहीत. या सर्व राजभवनी रहिवाशांस स्वतःचे राजकीय कंडूशमन इतके अशक्यप्राय वाटत असेल तर खरे तर त्यांनी अधिकृतपणे राजकारणात प्रवेश करून तेथे संबंधितांशी दोन हात करावेत. ती यांची हिंमत नाही आणि कुवतही नाही. म्हणून त्यांना मागच्या दरवाजाने राजभवनात धाडणाऱ्यांच्या ऋणांतून उतराई होण्यासाठी हे सर्व राजकीय अतृप्त आत्मे हे असला हुच्चपणा करू लागले आहेत. असे प्रकार याआधीही झालेले आहेत. पण भाजप-कालीन राज्यपालांची ह्यउंचीह्ण गाठणे काँग्रेसलाही शक्य झाले नव्हते हे अमान्य करता येणे अवघड. सदर तमिळनाडू प्रकरणात राज्य सरकार आपणास हिंग लावून विचारत नाही आणि आपल्याबाबत केंद्र फक्त बघ्याची भूमिका घेते, उघड काही पाठिंबा देत नाही हे एव्हाना या महामहीम रवींस ध्यानी आलेच असेल. अशा अवस्थेत राज्य सरकारच्या निषेधात राजीनामा देऊन राज्यपालपदाचा त्याग करणे हा अत्यंत स्वाभिमानी पर्याय या राजभवनी रवींस उपलब्ध आहे. राजभवनात राहायचे आणि जनतेच्या खर्चाने राजकीय कंडू शमवण्याचा प्रयत्न करायचा हे निषेधार्ह.

# नवा रिंगरोड सर्व शहरांना जोडणार, कोंडी दूर करणार

## मुख्यमंत्री शिंदे यांची घोषणा; एमएमआरडीएला नियोजन करण्याची सूचना

**कल्याण प्रतिनिधी,** मुंबईसह एमएमआर क्षेत्रांतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो अशी दळणवळणाची साधने निर्माण केली जात आहेत. त्याचप्रमाणे कल्याण-डोंबिवली परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दूर करण्यासाठीदेखील पनवेल, नवी मुंबईपासून ते अंबरनाथ, बदलापूर उपनगरातील सर्व शहरांना जोडणारा नवा रिंगरोड करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच त्याचे नियोजन करण्याची सूचना एमएमआरडीएला करू, असेही त्यांनी यावेळी सांगितले.



कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या वतीने साकारण्यात आलेले कल्याणमधील सिटीपार्क तसेच कै. दिलीप कपोते बहुमजली वाहनतळ इमारतीचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तर केडीएमटीच्या ताफ्यात दाखल झालेल्या ९ इलेक्ट्रिक बसेस, आधारवाडी येथील अग्निशमन केंद्र व क प्रभागक्षेत्र कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण, अमृत २.० प्रकल्प अंतर्गत गौरीपाडा येथे ९५ दशलक्ष लिटर क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र बांधणे, पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील नविन जलकुंभ बांधणे या विकास प्रकल्पांचे ऑनलाईन भूमिपूजन करण्यात आले. आचार्य अत्रे रंगमंदिर येथे झालेल्या सोहळ्यात प्रकल्प बाधितांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सदनिकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार विश्वनाथ भोईर, रमेश पाटील, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, भाजपचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र सुर्यवंशी, माजी महापौर विनिता राणे, आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड आदी उपस्थित होते. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी हैद्राबादच्या धर्तीवर नवी मुंबई विमानतळापासून ते बदलापूरपर्यंतच्या सर्व शहरांना जोडणारा तसेच थेट राष्ट्रीय महामार्गावर बाहेर पडणारा नवा एक्सेस कंट्रोल रिंग रोड करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. त्याची तातडीने दखल घेत उपनगरांतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी नवा रिंग रोड करण्याबाबत एमएमआरडीएला आपण सूचना करू, असे त्यांनी जाहीर केले. त्याचप्रमाणे पीएमपीएलच्या धर्तीवर कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर शहरासाठी स्वतंत्र परिवहन प्राधिकरण स्थापन करण्यात येईल, असेही सांगितले. सिटीपार्कच्या रूपाने एक चांगले विरंगुळा केंद्र येथील नागरिकांना उपलब्ध झाले आहे.

◆ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येवर शहरात असे ऑक्सिजन पार्क होणे गरजेचे आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून अर्बन फॉरेस्ट तयार करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

◆ त्याचप्रमाणे शहरातही डीप क्लीन मोहीम राबवावी, स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, उल्हासनगरप्रमाणेच कल्याणमध्येही सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी पालिका आयुक्तांना दिल्या.

◆केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील म्हणाले, केंद्र शासनाने कल्याण शहराची स्मार्ट सिटीमध्ये निवड केल्याने शहराच्या विकासात मोठा बदल होत आहे. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि सिटी पार्क हे प्रकल्प शहराच्या वैभवात भर घालणारे आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.



## विमानाच्या स्वच्छतागृहात सापडली धमकीची चिट्ठी

**मुंबई प्रतिनिधी,** इंडिगो एअरलाइन्सच्या चेन्नईहून मुंबईला येणाऱ्या विमानाच्या स्वच्छतागृहात मंगळवारी सकाळी एक धमकीची चिठ्ठी सापडल्याने एकच खळबळ उडाली. विमान लँड होण्याच्या काही मिनिटे आधी ही चिठ्ठी सापडली होती. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका टिशू पेपरवर ‘मुंबईला याल तर सगळे मरतील’ अशा आशयाचा मजकूर लिहिण्यात आला होता. विमान मुंबई विमानतळावर लँड होण्याच्या काही मिनिटे आधी ही धमकीची चिठ्ठी ‘केबिन क्रू’च्या निदर्शनास आली. त्यांनी ही माहिती वरिष्ठांना दिली. विमानाच्या कॅप्टनने तत्काळ एअर ट्रॅफिक कंट्रोलला कळवले. या घटनेने मुंबई विमानतळ प्रशासन अलर्ट मोडवर आले.

# What the Punjab farmer wants is not what the Punjab farmer needs



**Punjab :** in Punjab is struggling with several structural issues for which guaranteed MSP can't even be a temporary fix let alone a solution. On the contrary, it will keep worsening the situation. The crises that besiege agriculture in Punjab rarely get so much play from farmer unions as MSP. That's short-sightedness. What the Punjab farmer wants is not what the Punjab farmer needs Farmers gather near the Punjab-Haryana Shambhu border during their 'Delhi Chalo' march. Farmers are headed to Delhi again after a gap of two years with the demand for a guaranteed and higher minimum support price (MSP), in addition to other demands such as loan waivers, Rs 10,000 monthly pension for all farmers above 60 years, and India's exit from WTO and free-trade agreements. MSP has become the most prominent feature of the farmer protest. A farmer has to face risks on several counts such as weather, yield, price, government procurement system, etc. The government compensates the farmer, especially the farmer in Punjab which has been the food bowl of India, with subsidies on fertilisers, power, loans, etc. as well as providing an MSP mechanism.MSP is the price at which the government purchases crops from the farmers, providing them with assured income for their produce. This price acts as a safety net for farmers, ensuring they receive a fair price for their crops, particularly during times of market fluctuations or when market prices fall below the MSP.

# Delhi Metro records highest-ever daily ridership at 71.09 lakh on Feb 13

**Delhi :** The Delhi Metro on February 13 registered the highest-ever count of daily passenger journeys at 71.09 lakh, a record achieved on a day when huge traffic jams were reported in the NCR amid heavy security arrangements in view of a farmers' march to the national capital The Delhi Metro on February 13 registered the highest-ever count of daily passenger journeys at 71.09 lakh, a record achieved on a day when huge traffic jams were reported in the NCR amid heavy security arrangements in view of a farmers' march to the national capital. The count of daily passenger journeys in Delhi Metro had stood at 71.03 lakh on September 4 and 69.94 lakh on August 29 in 2023. "Delhi Metro broke its highest passenger journeys record set in September 2023 by registering an unmatched 71.09 lakh passenger ridership on Tuesday (February 13, 2024), the highest ever daily passenger ridership," the DMRC said in its post. It also shared a poster, saying "Delhi Metro has crossed another milestone of success". On Tuesday, the Delhi Metro had regulated passengers' entry and exit at nine stations by shutting some gates for several hours in view of the farmers' march towards Delhi. The commuters were allowed to enter or exit these stations through other gates.



# Jammu and Kashmir LG Manoj Sinha pays tributes to 2019 Pulwama terror attack victims

**Srinagar:** Jammu and Kashmir Lieutenant Governor Manoj Sinha on Wednesday paid tributes to 40 CRPF personnel on the fifth anniversary of the 2019 Pulwama suicide attack in the Union Territory.



Jammu and Kashmir Lieutenant Governor Manoj Sinha on Wednesday paid tributes to 40 CRPF personnel on the fifth anniversary of the 2019 Pulwama suicide attack in the Union Territory.

"Humble tributes to the bravehearts who sacrificed their lives in the 2019 Pulwama terror attack. The nation will forever remain indebted to their exemplary courage, supreme sacrifice and selfless service to the motherland," Sinha said in a post on X. A function was organised by the CRPF at the martyrs memorial for paying tributes to the slain CRPF personnel but it was not open to media coverage. As many as 40 jawans were killed when a Jaish-e-Mohammad suicide bomber rammed an explosive-laden car into a CRPF convoy at Lethpora-Pulwama on Jammu-Srinagar National Highway on this day in 2019.

# भिवंडीत अचानक लागलेल्या आगीमुळे झोपडीतील सिलिंडरचा स्फोट



## गणेश दर्शनासाठी आलेल्या भाविकांची झाली पळापळ

▮ **भिवंडी प्रतिनिधी,** भिवंडी शहरातील आदर्श पार्क येथे मातीची मडकी विक्रीचे दुकान असलेल्या मोकळ्या जागेत सायंकाळी अचानक लागलेल्या भीषण आगीमध्ये लगतच्या झोपडीत असलेल्या सिलिंडरचा स्फोट झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी आगीच्या ज्वाळा इतरत्र पसरल्याने एक मोटारसायकल आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. यावेळी एक जण जखमी झाला. या आगीची माहिती स्थानिक पोलीस व भिवंडी पालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थानिक नागरिकांसह सुमारे दोन तास पाण्याचा मारा करत ही आग आटोक्यात आणून विझवली. आगीच्या भीषणतेमुळे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून यावेळी वीजपुरवठाही खंडित करण्यात आला. त्यामुळे आदर्श नगर येथे माघी गणेशोत्सवानिमित्त गणेश दर्शनासाठी आलेल्या नागरिकांचीसुद्धा धावपळ उडाली. त्यामुळे पोलिसांनी विशेष बंदोबस्त तैनात केला होता.

माघी गणेश जयंती असल्यामुळे आदर्श पार्क येथे गणेशभक्त मोठ्या संख्येने आले होते. मात्र अचानकपणे मातीची मडकी विकण्याच्या ठिकाणी आग लागली. तेथे छप्पर ताडपत्रीचे असल्याने आग भडकत गेली आणि तेथील झोपडीत असलेल्या सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. कानठळ्या बसवणारा आवाज झाल्याने रस्त्यावरून जाणारे नागरिक व महिला वर्ग घाबरून सैरावैरा पळत होते. आगीने भीषण रूप धारण केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यावेळी या परिसरात निजामपूर पोलिसांची गस्त सुरू असल्याने त्यांनी तत्काळ या घटनेची माहिती भिवंडी अग्निशमन दलाला दिली. त्यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत आगीवर दोन तासांत नियंत्रण मिळवले. ही आग कशामुळे लागली याचे मात्र कारण अद्याप समजलेले नाही, अशी माहिती स्थानिक निजामपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी दिली आहे.

## 'व्हॅलेंटाईन डे' साजरा करताना जोडप्यांना पोलिसांचा त्रास


▮ **मुंबई प्रतिनिधी,** शहरातील प्रसिद्ध ठिकाणी 'व्हॅलेंटाईन डे' वीक साजरा करताना पोलिसांकडून जोडप्यांचा छळ झाल्याचा आरोप जोडप्यांनी केला आहे. व्हॅलेंटाइन डे अगदी जवळ आला आहे. यासोबतच जोडप्यांनी आधीच व्हॅलेंटाइन सप्ताह साजरा करण्यास सुरुवात केली आहे. व्हॅलेंटाइन डेच्या आधी, मुंबईतील प्रसिद्ध ठिकाणी भेट देणाऱ्या अनेक जोडप्यांनी नैतिक पोलिसांकडून छळ केल्याबद्दल तक्रारी केल्या आहेत. तसेच स्थानिक रहिवाशांनी पोलिस कर्मचारी बागेत गैरवर्तन करणाऱ्या जोडप्यांकडून पैसे उकळत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. व्हॅलेंटाइन सप्ताहमध्ये मुंबईतील सर्वात प्रसिद्ध ठिकाणांपैकी एक असलेल्या हँगिंग गार्डनमध्ये काही वेळ घालवण्यासाठी पार्कला भेट देणाऱ्या जोडप्यांची संख्या वाढ होत आहे. प्रेमाच्या या आठवड्यात काही जोडप्यांना त्यांच्या भेटीदरम्यान वाईट अनुभवाचा सामना करावा लागला आहे. पोलिसांकडून त्यांचा छळ केल्याचा आरोप जोडप्यांनी केला आहे. हँगिंग गार्डन हे नेहमीच जोडप्यांचे आवडते ठिकाण राहिले आहे. येथे अनेक पर्यटक तसेच कुटुंबे स्थानिकांसह संध्याकाळच्या फेरफटका मारताना जोडपी आढळतात. हँगिंग गार्डन सारख्या ठिकाणी भेट देणाऱ्या अनेक जोडप्यांनी त्यांचे अनुभव सांगितले आहे. एका जोडप्याने बागेत चुबन घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना धक्काबुक्की करण्यात आली.

# कंपनीची १४.२३ कोटींची फसवणूक

▮ **मुंबई प्रतिनिधी,** जुन्या आणि प्रलंबित ऑर्डर्स पूर्ण केल्यानंतर यातून ३८ कोटींचे उत्पन्न निर्माण होईल, अशी बतावणी करत एका कंपनीच्या मालकाने १४कोटी २३ लाखांचा माल घेऊन अंधेरीतील कंपनीची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खंबाला हिल परिसरात राहात असलेल्या ५८ वर्षीय व्यापाऱ्याने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची कंपनी इलेक्ट्रिकल केबल्स, पॉवर इक्विपमेंट, सोलर पॉवर जनरेटिंग डिव्हाईस व अन्य उत्पादने करणारी आणि पुरवठादार कंपनी आहे. त्यांच्या ग्रुप ऑफ कंपनीचे अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी येथे कार्यालय आहे. त्यांना हितेन खटाव, रोहन खटाव आणि अन्य मालक असलेली नाशिकमधील एक कंपनी आर्थिक तोट्यामुळे बंद असल्याची माहिती समजली. तक्रारदारांच्या कंपनीने या कंपनीचा केबल आणि वायर विभाग विकत घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली.

या कंपनीचा केबल वायरचा प्लॅण्ट बंद असल्यामुळे या कंपनीने विविध कंपन्यांच्या प्रकल्पाच्या अंतर्गत घेतलेल्या ऑर्डरचा माल पुरवठा केला नव्हता. जुन्या आणि प्रलंबित ऑर्डर्स न घेता तक्रारदार यांच्या कंपनीने करार केला. मात्र जुन्या आणि प्रलंबित ऑर्डर्स पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ कोटींची मागणी केली. जुन्या आणि प्रलंबित ऑर्डर्स पूर्ण केल्यानंतर यातून ३८ कोटींचे उत्पन्न निर्माण होईल, असे सांगितले. तक्रारदारांच्या कंपनीने फेब्रुवारी ते जून २०२२




या काळात १४कोटी २३ लाख ९२ हजार ९९५ रुपये किमतीचा माल पुरवला. मात्र त्याचे पेमेंट न करता तक्रारदारांच्या कंपनीची फसवणूक केली. अखेर तक्रारदारांनी याबाबत आर्थिक गुन्हे शाखेत तक्रार दिली आहे.

# महिलेचे मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

## आठवडाभरात तीन महिलांचे दागिने लुटले



▮ **नवी मुंबई प्रतिनिधी,** सोनसाखळी चोरांनी सोमवारी रात्री शतपावली करण्यासाठी घराबाहेर पडलेल्या एका महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र खेचून पलायन केल्याची घटना घडली. रबाळे पोलिसांनी या लुटारूंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, चेन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारूंनी ऐरोली भागात मागील आठवडाभरात केलेली ही तिसरी चेन स्नॅचिंगची घटना आहे.

गत आठवड्यात या लुटारूंनी दोन महिला शिक्षकांच्या अंगावरील दागिने लुटून नेले होते. सिंधू मोरे (५४) या ऐरोली सेक्टर-५ येथून नेहमी प्रमाणे रात्री जेवणानंतर शतपावली करताना पाठीमागून मोटारसायकलवरून आलेल्या दोघा लुटारूंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारूने सिंधू मोरे यांच्या पाठीवर जोरात थाप मारून त्यांच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून भरधाव वेगात पेट्रोल पंपाच्या दिशेने पळून गेले. या प्रकारानंतर सर्व महिलांनी आरडाओरड केली.

मात्र तोपर्यंत दोघे लुटारू दिसेनासे झाले. त्यानंतर या सर्व महिलांनी रबाळे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

# वृद्ध महिलेला लुटून दुचाकीवरून केला पोबारा

## मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा

▮ **नालासोपारा :** भांडी, दागिने पॉलिश करून देतो सांगून विरारच्या खानिवडेत एका दुकलीने वृद्धेला दिवसाढवळ्या लुटल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

दागिने स्वच्छ लखखीत करून देतो म्हणून दारावर दुचाकीने आलेल्या दोन पावडर विकणाऱ्या ठगांनी घरात एकटी असलेल्या वृद्धेला दागिने चमकवून देण्याच्या बहाण्याने लुटल्याची घटना वसई पूर्वे कडील ग्रामीण भागात



दिवसाढवळ्या घडल्याने महाठगांची दहशत पसरली आहे. या घटनेतील दोन्ही आरोपी दुचाकीसह गावातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसत असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खानिवडे गावात वरील दोन ठग गावात फिरून भांडी स्वच्छ करण्याची पावडर २५ रु.एक पुडी याप्रमाणे विकण्याचा तगादा गावातील अनेक घरांच्या दारावर जाऊन लावत होते.

मात्र घरात इतर ही सदस्य असल्याने ते पुढील घराकडे आपला मोर्चा वळवत होते. यातील एक व्यक्ती घरत यांच्या कंपाऊंडमध्ये घुसून दाराजवळ जाऊन कुटुंबातील एका वृद्धेला पावडर घ्या. छान आहे. एकदा वापरली की परत मागाल, असे सांगितले. महिला नको नको म्हणत असताना मधाळ बोलून विश्वास संपादन करून प्रथम घरातील एक तांब्याचे भांडे लखख करून दाखवले. नंतर त्याने घरात आणखी कोणी आहे का याची चौकशी केली. महिलेने एकटीच असल्याचे सांगताच त्याने भांड्यांपेक्षा दागिने नव्या सारखे चमकतात, असे सांगत बोलण्यात गुंतवून गळ्यातील सोनसाखळी काढली. त्याच्याकडील डब्यात हातचलाखी करत ठेवल्याचे भासवले. डबा गॅसवर तापवा, असे सांगितले. वृद्धेने गॅसवर डबा ठेवण्यास गेली असताना त्याने पळ काढला. एक साथीदार कंपाऊंडबाहेर दुचाकी चालू करून उभा होता त्यावर बसून पोबारा केला.

# डोंबिवलीत खाडी किनारी मातीचा भराव टाकून खारफुटी नष्ट?

▮ कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न न्यायालयात गाजत असताना देवीचापाडा येथे खाडी किनारी जेट्टीच्या भागात भूमाफियांनी मातीचे भराव टाकून खाडी किनारा बुजविण्याचे काम सुरू केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

▮ शहरात मोकळ्या जागा नसल्याने नागरिकांच्या सोयीसाठी, पर्यावरण संवर्धनासाठी हरितपट्टे विकसित करा, असे आवाहन नुकतेच आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी केले आहे. मात्र त्यांच्या आवाहनाला प्रशासनातील अधिकारी दाद देत नाहीत. कुंभारखाणपाडा, देवीचापाडा हरितपट्ट्यात आजही मोठ्या प्रमाणात बेकायदा चाळी, इमारतींची बांधकामे सुरू आहेत.

▮ **डोंबिवली प्रतिनिधी,** खाडी किनारी असलेल्या कांदळ वन वा खारफुटीची जंगलाची कत्तल करण्यास मनाई आहे. मात्र डोंबिवली पश्चिमेतील उल्हास खाडी किनाऱ्यावरील देवीचा पाडा जेट्टीजवळ जेसीबीच्या सहाय्याने मातीचा भराव बिनधास्त टाकून खारफुटी नष्ट करण्याचा प्रकार दिवसाढवळ्या सुरू आहे. अनधिकृत बांधकामे करण्यासाठी भूमाफिया अशा प्रकारे मातीचा भराव टाकून खाडी किनारा बुजविण्याचे काम सुरू आहे. वास्तविक खारफुटीची वनस्पती ही पूरसंरक्षक असल्याने त्या घनदाट जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणांची आहे. परंतु दिवसाढवळ्या खाडी किनारी मातीचे भराव टाकून खाडीपात्र बुजविण्यात येत असतानादेखील केडीएमसी, महसूल विभाग व महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने पर्यावरणप्रेमींनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

डोंबिवली पश्चिमेला कोपर, जुनी डोंबिवली, मोठागाव, देवीचापाडा, गरीबाचा वाडा, कुंभारखाण पाडा, गणेशनगर असा सुंदर खाडी किनारा लाभला आहे. खाडी किनाऱ्यावरील जमीन हरितपट्टा म्हणून ओळखली जाते. या हरित पट्ट्यात बांधकामे करता येत नाहीत. पट्ट्यात कांदळवन अर्थात खारफुटीचे जंगल आहे. खारफुटीचे जंगल पूरसंरक्षक म्हणून गणले जाते. त्यामुळे त्या जंगलांची कत्तल करण्यास न्यायालयाने मनाई केलेली आहे. परंतु आता बेकायदा बैठ्या चाळींची बांधकामे करणाऱ्या येथील भूमाफियांची नजर मोकळ्या राहिलेल्या हरित पट्ट्यावर पडली आहे. गेल्या आठवडाभरापासून डम्परने माती आणून जेसीबीच्या सहाय्याने खाडी किनारा माती टाकून बुजवला जात आहे.

गेल्या वर्षीदेखील देवीचापाडा खाडी किनारच्या जेट्टी भागातील खारफुटीची जुनाट झाडे माफियांनी तोडून टाकली होती. खारफुटीचे जंगल नष्ट करण्यात आले होते. या भागात दरवर्षी पर्यावरणप्रेमी खारफुटीची लागवड करतात. त्यांचे संगोपन करतात. मात्र ही वाढलेली खारफुटीची झाडे नष्ट करण्याचे काम भूमाफियांकडून केले जाते. दिवसाढवळ्या हा प्रकार सुरू आहे. आता तर मातीचा भराव टाकून खाडी किनारा पूर्ण बुजविला जात आहे. त्या भूमाफियांना विरोध करणे धोक्याचे असल्याने कुणीही सर्वसामान्य नागरिक, पर्यावरणप्रेमी उघड विरोध वा तक्रार करण्यास धजावत नाही. सागरी व खाडी किनारा महाराष्ट्र सागरी मंडळाच्या व महसूल विभागाच्या अखत्यारित येतो. मात्र या दोन्ही विभागांचे याकडे पूर्ण दुर्लक्ष आहे. आपले कार्यक्षेत्र नसल्याने केडीएमसी प्रशासन हात वर करीत आहे. डोंबिवली शहराला सुंदर खाडी किनारी लाभला आहे. मात्र तेथे गणेश घाट व्यतिरिक्त काहीही झालेले नाही. त्यामुळे भूमाफियांनी मातीचे भराव टाकून खारफुटी नष्ट करीत खाडी किनारा बुजविण्यास घेतल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.



# विवाहितेला ब्लॅकमेल करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

▮ **मुंबई प्रतिनिधी,** अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी देत प्रियकरासह चौघांनी ३२ वर्षीय विवहितेला धमकावून तिच्याकडे घटस्फोटाच्या तडजोडीमध्ये मिळालेल्या साडेसात लाखांची मागणी केल्याचा प्रकार धारावीमध्ये समोर आला आहे. विवहितेच्या तक्रारीवरून प्रियकरासह तीन महिलांविरोधात गुन्हा दाखल करून धारावी पोलीस अधिक तपास करत आहेत.



कळवा परिसरात राहात असलेली ३२ वर्षीय पूजा (नाव बदललेले आहे) पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, विवाहापूर्वी धारावीमध्ये राहात होती. छत्तीसगडमधील एका तरुणासोबत २००६ पासून तिचे प्रेमसंबंध होते. आईवडिलांचा त्यांच्या प्रेमसंबंधांना विरोध असल्याने या दोघांचा विवाह होऊ शकला नाही. कुटुंबीयांनी २०१४ मध्ये पूजाचा भायखळा येथील रहिवासी तरुणासोबत विवाह करून दिला. प्रियकरसुद्धा विवाहाबंधनात अडकला. विवाहाच्या काही दिवसांनी पतीला तक्रारदार पूजाच्या विवाहपूर्वीच्या प्रेमसंबंधांबाबत समजले. यावरून दोघांमध्ये खटके उडू लागले. अखेर पूजाने माहेर गाठले. २०१७ मध्ये पतीने घटस्फोटाची केस दाखल केली. याच दरम्यान, पूजाची ओळख माहिममधील रहिवासी राजा याच्यासोबत झाली. पतीने दाखल केलेल्या घटस्फोटाच्या केसमध्ये तिला राजा मदत करू लागला. पूजाचे राजासोबत प्रेमसंबंध जुळले. दोघेही भेटू लागले. याच दरम्यान राजाने तिचे अश्लील फोटो काढले होते. वर्षभरानंतर म्हणजेच कोरोना महामारी सुरू होताच या दोघांचे प्रेमसंबंध तुटले. तर, दुसरीकडे पूजाचे छत्तीसगडमधील प्रियकरासोबत पुन्हा सूत जुळले. याच दरम्यान गेल्या वर्षी पूजाच्या घटस्फोटाच्या केसचा निकाल लागला. पतीकडून तिला साडेसात लाख रुपये मिळाले. पतीकडून पैसे मिळताच घटस्फोटाच्या केसमध्ये मदत करणाऱ्या एका मैत्रिणीने आणि राजाने तिच्याकडे पैशांची मागणी सुरू केली. पूजाने पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांच्यात वाद झाले. पूजा ही पूर्वाश्रमीच्या छत्तीसगडमधील प्रियकराला भेटत होती. याबाबत त्याच्या पत्नीला समजले. जानेवारी महिन्यात पूजा माहेरी गेली असता राजाने प्रियकराच्या पत्नीला त्यांचे अश्लील फोटो पाठविल्याचे समजले. प्रियकराच्या पत्नीने आपल्या पतीसोबतचे प्रेमसंबंध न तोडल्यास हे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. तर, घटस्फोटाच्या केसमध्ये मदत करणाऱ्या एका मैत्रिणीने आणि तिच्या बहिणीने पैसे न दिल्यास राजासोबत असलेले अश्लील फोटो व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी देऊ लागल्या. राजानेच या दोघींना त्यांचे खासगी अश्लील फोटो दिल्याचे पूजाला समजले. घडल्याप्रकाराने तिला धक्का बसला. अखेर तिने पोलिसांत धाव घेत राजासह अन्य तिघींविरोधात तक्रार दिली आहे.

## नळाच्या वादावरून माजी नगरसेवीकेला धमकी

▮ **मुंबई प्रतिनिधी,** नळ कनेक्शनच्या वादातून माजी काँग्रेस नगरसेवीकेला धमकी आणि विनयभंग केल्या प्रकरणी एका ज्येष्ठ नागरिकासह तिघांना सोमवारी बोरीवली पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. भाग्यवंत लाटे, यशोधन लाटे आणि मकरंद बारगजे अशी या अटक आरोपींची नावे आहेत.काँग्रेसच्या माजी नगरसेविका स्वेता कोरगावकर यांनी आरोपींच्या 'बेकायदेशीर नळाच्या जोडणीला आक्षेप घेतल्यानंतर त्यांना धमक्या देण्यात आल्या होत्या. या प्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला कारवाई करण्यास टाळाटाळ केल्याचा कोरगावकर यांनी आरोप केला आहे. बोरीवलीच्या गोराई भागात 'सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सुरू केले होते. कार्यादरम्यान स्थानिकांना चार अवैध नळजोडण्या आरोपींच्या घराशी जोडलेल्या सापडल्या.

# साखरशेत ग्रामस्थांची पाणीटंचाई होणार दूर



## महिला, ग्रामस्थांना मोठा दिलासा

▮ **जव्हार :** फुग्रो इंडिया व दिगंत स्वराज फाउंडेशनच्या माध्यमातून काही वर्षांपासून नदी गावाच्या ३ किमी अंतरावर असूनसुद्धा पाण्यापासून वंचित असणाऱ्या साखरशेत गावात अखेर सौरउर्जेच्या सहाय्याने २ किलोवॅट म्हणजेच २ हॉर्स पॉवरच्या सहाय्याने पाणीउचल करून देण्यात आले आहे. साखरशेत हे गाव वाडा तालुक्यातील आदिवासी बहुल व दुर्गम भाग आहे. येथे पाण्याची वणवण जानेवारी अखेरपासून महिलांना सहन करावी लागते. कधी गढूळ पाणी, कधी नदीच्या काठी खड्डे खोदून दूषित पाणी पिण्याची वेळ येत होती. मात्र आता त्यांची पाणीटंचाई दूर होणार आहे.

ही समस्या लक्षात घेऊन फुग्रो इंडिया व दिगंत स्वराज फाउंडेशन यांच्या माध्यमातून ६००० लि क्षमतेचे तीन हौद व प्रत्येक कुटुंबाला वॉटर फिल्टर दिलेले आहे. यासाठी साखरशेत ग्रामस्थांचे श्रमदान व मदतीच्या सहाकार्यामुळे हा प्रयोग यशस्वी झाला आहे. यामुळे येथील पाणी समस्येवर मात करण्यात आली आहे. महिला व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. याप्रसंगी फुग्रोइंडिया चे पदाधिकारी, साखरशेत ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वासिंदमध्ये उभे राहणार कायमस्वरूपी हेलिपॅड

## जमिनीचा शोध, वैद्यकीय मदतीकामी ठरेल उपयुक्त

▮ **भरत उबाळे**

**शहापूर :** आपत्कालीन परिस्थितीत, तातडीच्या वैद्यकीय मदतीकामी आणि व्हीआयपी, व्हीव्हीआयपी यांच्या अवकाश उड्डाणासाठी मुंबई-नाशिक व मुंबई-नागपूर समृद्धी राष्ट्रीय महामार्ग आणि मध्य रेल्वे, तसेच संभाव्य बुलेट ट्रेन मार्गासोबत जलद गतीने हवाई वाहतुकीस उपयोगी ठरावे, म्हणून शहापूर तालुक्यातील वासिंद व खातीवली गावाच्या हद्दीत कायमस्वरूपी हेलिपॅड उभारण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

भूमिअभिलेख, महसूल विभाग आणि सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांकडून वासिंदमध्ये संयुक्तपणे जमिनीचा शोध घेण्यात येत असून चाचपणी सुरू आहे.

> "वासिंद व खातीवली गावाजवळ कायमस्वरूपी होणाऱ्या हेलिपॅडसाठी जमिनीची पाहणी सुरू आहे. महाराष्ट्र विमानतळकंपनीने निश्चित केलेल्या निकषांत येणारी जमीन हेलिपॅडसाठी निश्चित करण्यात येणार आहे.
> – डी. एस. खेडकर, महसूल मंडळ निरीक्षक, वासिंद, ता. शहापूर

▮ उभारण्यात येणाऱ्या हेलिपॅडच्या सभोवताली संरक्षक भिंत बांधण्यात येणार आहे. तेथे रात्रंदिवस कर्मचारी कर्तव्यावर नियुक्त करण्यात येणार आहेत. एकावेळी किमान २ हेलिकॉप्टर उतरतील, अशा सोयीचे हे हेलिपॅड असणार आहे.

▮ याची देखभाल आणि दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम खात्यावर सोपवण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने निगराणीसाठी पोलीस कर्मचाऱ्यांचीदेखील नेमणूक करण्यात येणार आहे.

▮ पावसाळ्यातही पावसाच्या अडथळ्यांशिवाय या हेलिपॅडचा सहज उपयोग करता येईल, अशा पद्धतीने त्याचे बांधकाम करण्यात येणार आहे.




महाराष्ट्र विमानतळ कंपनीच्या संचालक मंडळाच्या ८१ व्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जवळील शहापूर तालुक्यासाठी हेलिपॅड उभारण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मुंबई-नाशिक महामार्गावरील वासिंद व खातीवली गावाच्या हद्दीत जमिनीचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे.

शहापूर तालुक्यात व अवतीभोवतीच्या परिसरात अग्निजन्य घटना, तसेच पावसाळ्यातील नदी-नाल्यांना येणाऱ्या पूरस्थितीच्या घटनांची भीती असते. शहापूर जवळ वासिंद, आसनगाव, पुणधे, आटगाव, लाहे, कलमगाव, खर्डी येथे औद्योगिक वसाहतींचे विस्तारीकरण होऊ लागले आहे. तेथेही अपघाताच्या घटनांची संभाव्य भीती वाढली आहे. शिवाय, तालुक्यात राजकीय, सामाजिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांच्या निमित्ताने व्हीआयपींचीही ये-जा असते.

◆शहापूर तालुक्यातून मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग आणि मध्य रेल्वेचा वाहतूक मार्ग आहेच. यासोबत मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग प्रगतीपथावर आहे. त्याला समांतर मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन मंजुरीच्या घोषणेच्या अंतिम टप्प्यात आहे.

◆अशा ठिकाणी दुर्दैवाने एखादा भयंकर अपघात घडल्यास वासिंदमधील हेलिपॅड अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्या अनुषंगाने येथील हेलिपॅडला देण्यात आलेली मंजुरी शहापूर तालुक्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरली आहे.